भाजीपाला

# थंड कुळातील भाजीपाल्याचे नियोजन



**प्रा. संदीप ठाकरे**
(मो.नं. ९५२७२०१०४०)
क.का. वाघ कृषी महाविद्यालय, नाशिक
**विशाखा बागूल**
(आचार्य पदवी)
महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर

सध्या भारतासह महाराष्ट्रातही असंख्य शहरात थंड कुळातील म्हणजेच कोबीवर्गीय भाजीपाला पिके खूपच लोकप्रिय होताना दिसून येत आहे. तसेच मोठ्या प्रमाणात उत्पादन देखील घेतले जात आहे. अगदी सर्वसामान्य माणसापासून तर मोठमोठ्या पंचतारांकित उपाहारगृहांमध्ये देखील अशा भाज्यांना चांगली मागणी असते, शिवाय या भाज्यांचे अधिक उत्पादन घेऊन आपण अधिक पैसे मिळवू शकतो.

कोरोना या जागतिक महामारीने सर्वांना आपल्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी, आपले शारीरिक, मानसिक आरोग्य सुदृढ कसे ठेवावे हे फार चांगले शिकवले असल्याने सर्वसामान्य माणूस देखील अतिशय जागरूक होताना दिसत आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता आपण प्रत्येक हंगामानुसार बाजारात उपलब्ध असलेल्या भाजी पिकांचे सेवन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. थंड कुळातील भाजीपाला पिके म्हणजेच कोबी, कॉलिफ्लॉवर, ब्रोकोली, ब्रुसेल्स स्प्राऊट, नवलकोल, लाल कोबी, चायनीज कोबी इत्यादी. नुकताच पाऊस संपलेला असल्याने जमिनीचा पोत भरपूर पाणी पिऊन सुपीक झालेला असतो. त्या कारणाने ही भाजीपाला पिके मशागतीला अगदी सोपी, सुटसुटीत आणि कमी कालावधीत म्हणजेच जवळपास ६० ते ९० दिवसांत तयार होतात. ही पिके भरपूर उत्पादन क्षमता असलेली (३० ते ६० टन प्रतिहेक्टरी) आहेत.

**जमीन आणि हवामान :** थंड कुळातील भाजीपाला पिकांना लागवडीसाठी पाण्याचा उत्तम निचरा होणारी तसेच मध्यम ते भारी सुपीक जमीन अधिक मानवते. अनुकूल हवामानाबरोबरच बाजारभाव, बाजारातील मागणी, कीड-रोगांची लागण या सर्व गोष्टींचा विचार करून नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे. बेताचा पाऊस- ५००-६५० मिलिमीटर आणि योग्य ते तापमान सर्वसाधारण २५ ते ३० अंश सेल्सिअसपेक्षा कमी असल्यास आपण या पिकांची लागवड करून अधिक उत्पन्न घेऊ शकतो. गड्डा धरण्याच्या काळात वातावरणात चढ-उतार झाल्यास उत्पादनासोबत गुणवत्तेवरही परिणाम होतो.

**लागवड पद्धत :** आजकाल भाजीपाला रोपवाटिका व्यवसाय खूप उदयास आला असल्याकारणाने आपल्याला कुठल्याही भाजीपाला पिकाची तयार रोपे २० दिवसांत मिळत असतात. त्यामुळे शेतकऱ्यांचा रोपवाटिका व्यवस्थापनाचा खर्च कमी झाला आहे. भाजीपाल्याची रोपे तयार होत असताना जिथे आपल्याला लागवड करायची आहे त्या जमिनीची उभी-आडवी नांगरणी करून तण वेचून जमीन भुसभुशीत करून सरी-वरंबा आखणी करून ठेवणे गरजेचे आहे. लागवडीसाठी दोन रोपांमधील आणि ओळींमधील अंतर ठरविताना जमिनीची सुपीकता, पिकाची जात, हंगाम इत्यादी गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. भारी काळ्या जमिनीत लागवडीचे अंतर नेहमी जास्त ठेवावे, हळव्या जमिनीत कमी अंतरावर लागवड केल्यास उत्तम. जोमाने (पसरत) वाढणाऱ्या तसेच उशिरा तयार होणाऱ्या जातींची लागवड करताना लागवडीचे अंतर जास्त ठेवावे. रोपे लावताना मुळ्या सरळ जमिनीत राहतील अशा प्रकारे रोपांची लागवड करावी.

**आंतरपिके :** थंड हवामानात पिकांच्या लागवडीनंतर सुरवातीच्या काळात वाढ मंदगतीने होत असते. या काळात लवकर वाढणारी आंतरपिके घेऊ शकतो. उदा. मुळा, कोथिंबिर, नवलकोल यासारखी ५ ते ६ आठवड्यांत तयार होणारी पिके घेऊन आपण आपल्या उत्पादनात भर टाकू शकतो. आंतरपिके घेताना मुख्य पिकाच्या वाढीवर काही परिणाम होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे. आंतरपिकांमुळे तणाच्या वाढीवर काही प्रमाणात आळा बसून जमिनीची सुपीकता टिकून ठेवण्यास मदत होते. ■